# सिंधुदुर्ग सहकारी बँक लि., मुंबई.
**SINDHUDURG CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI.**

नोंदणीकृत पत्ता : हरहरवाला बिल्डिंग क्र.१, साने गुरुजी मार्ग, गणेश टॉकीज समोर, लालबाग, मुंबई - ४०० ०१२.

## १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
### (फक्त सभासदांकरिता)

**सिंधुदुर्ग सहकारी बँक लि.,** मुंबई या बँकेच्या सभासदांची सन २०१३-२०१४ सालची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि.०२ ऑगस्ट २०१४** रोजी संध्याकाळी ठीक ५.०० वाजता, खालील विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेण्याकरिता, बँकेचे अध्यक्ष **मा. श्री. हरिष बा. परब** यांच्या अध्यक्षतेखाली, डॉ. शिरोडकर स्मारक मंदिर सभागृह, नरेपार्क मैदानाजवळ, डॉ. बोर्जेस रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२ येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### : सभेपुढील विषय :

१) दिनांक ०३ ऑगस्ट २०१३ रोजी संपन्न झालेल्या बँकेच्या सन २०१२-२०१३ सालच्या १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल तसेच लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली ताळेबंद व नफा-तोटा पत्रके स्वीकृत करणे.
३) बँकेचा सन २०१३-२०१४ सालचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल स्वीकारणे.
४) सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचा दोष दुरुस्ती अहवाल स्वीकृत करणे.
५) संचालक मंडळाने अहवालात शिफारस केलेल्या निव्वळ नफ्याच्या विभागणीस मंजुरी देणे.
६) सन २०१४-२०१५ सालाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) सन २०१४-२०१५ सालाकरिता अंतर्गत लेखापरीक्षक आणि शासनाने मंजूर केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेतील लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**मुंबई :**
**(अ. व. प्रभुदेसाई)**
**दिनांक :** ३०-०६-२०१४
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :** गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभा त्याच जागी, त्याच दिवशी संध्याकाळी ठीक ५.३० वाजता त्याच कामाकरिता घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

---

## :विशेष सूचना :

१) दिनांक ०३ ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या बँकेच्या १५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त ज्या सभासदांना पाहावयाचे असेल त्यांनी बँकेच्या लालबाग येथील कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटून कार्यालयीन वेळेत पाहावे.
२) सभेच्या अनुषंगाने सभासदांना काही माहिती हवी असेल किंवा सूचना, प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील त्यांनी लेखी स्वरुपात दि.२४-०७-२०१४ पर्यंत अगर तत्पूर्वी बँकेच्या लालबाग येथील मुख्य कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.
३) सभासदाने सभेस येताना कृपया सूचना पत्रिका घेऊन यावी.
४) सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या नावात अगर पत्त्यात बदल झाला असल्यास त्यांनी तसे बँकेस लेखी कळवावे, म्हणजे बँकेस आपली सभासद यादी अद्ययावत करता येईल व आपणाशी संपर्क साधणे शक्य होईल.
५) जे सभासद दिवंगत झाले असतील त्यांच्या वारसांनी बँकेस याबाबत त्वरीत लेखी माहिती योग्य दाखल्यांसह कळवावी.
६) दि. ३१-०३-२०११ अखेरचा लाभांश दि. ३१ जुलै२०१४ पर्यंत न नेल्यास पोटनियम क्र. ५८ (ड) नुसार बँकेच्या गंगाजळीत जमा करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.
७) बँकेच्यावतीने शैक्षणिक, क्रीडा व विशेष नैपुण्यप्राप्त सभासद पाल्यांचा गौरव करण्याचा मनोदय आहे. तरी ज्या सभासदांच्या पाल्यांना एस्. एस्. सी. / एच्.एस्.सी. परीक्षेत ७५% पेक्षा अधिक व पदवी परीक्षेत ७०% पेक्षा अधिक गुण मिळाले असतील त्यांनी दि. **३१-०८-२०१४** पूर्वी त्यांची नावे प्रमाणित गुणपत्रिकेसह बँकेत आणून द्यावीत.

## ❖ संचालक मंडळाचा अहवाल ❖

**सन्माननीय बंधू - भगिनींनो,**

१९९२ साली म्हणजेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत सरकारने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. त्यामुळे सरकार व पर्यायाने भारतीय रिझर्व्ह बँकेला मुक्त अर्थव्यवस्थेला पूरक असे बदल टप्प्याटप्प्याने करावे लागले. त्या मुक्त अर्थव्यवस्थेचा व उदारीकरणाचा एक भाग म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने एच्डीएफ्सी बँक, आय्सीआय्सीआय् बँक व इतर ८ बँका अशा एकूण १० खाजगी बँकाना बँकिंग परवाने देण्यात आले. तद्नंतर सन २००० मध्ये कोटक महिंद्र व येस बँक या दोन बँकांना परवाने देण्यात आले. तर १ अेप्रिल २०१४ रोजी इन्फ्रास्टक्चर डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी (आयडीएफ्सी) व बंधन फायनान्शियल सर्व्हिसीस या दोन खाजगी कंपन्यांना खाजगी बँकांचे परवाने तत्वत: देण्यात आले. यापुढे देखील नियमित बँक परवाने देण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्नशिल राहिल व त्यासाठी एक विभागाची स्थापना करण्यात येईल, आणि भारतात (Inclusive Banking) सर्वसमावेशक बँकिंग म्हणजेच देशाच्या सर्व भागात प्रत्येक नागरीकाला आवश्यक बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे हे मुख्य उद्दीष्ट असेल असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी जाहीर केले आहे.

देशात आजमितीस २७ राष्ट्रीयकृत बँका, २१ खाजगी बँका आणि ४३ विदेशी बँका आणि मुंबईत ६७ सहकारी बँका असून त्या सर्व बँकांच्या एकूण ६८७८७ शाखा आहेत. एकूणच सध्या बँकिंग व्यवसायात तीव्र स्पर्धा सुरू आहे. त्यातच भारतीय राज्यघटनेत ९७ वी घटना दुरूस्ती लोकसभेत मंजूर केली व त्यास राष्ट्रपतींनी दिनांक १२-०१-२०१२ रोजी मंजुरी दिली. त्यामुळे महाराष्ट्र सरकारला देखील महाराष्ट्र सहकारी कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करून व घटनेशी सुसंगत असे आदर्श उपविधी तयार करणे क्रमप्राप्त झाले. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये घटना दुरूस्तीस अनुसरून सुधारणा करण्यात आल्या त्यास राज्यपालांनी दिनांक १३ ऑगस्ट २०१३ रोजी मंजुरी दिली व हा कायदा दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अस्तित्वात आला.

आपल्या बँकेने देखील ९७ व्या घटना दुरूस्तीस अनुसरून व प्रस्तावित महाराष्ट्र सहकारी कायद्यावर आधारीत सहकार खात्याने तयार केलेले सुधारीत आदर्श उपविधी आवश्यक त्या बदलांसह दिनांक १३ अेप्रिल २०१३ रोजी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करून आपल्या सर्वांच्या सहकार्याने मंजूर केले होते. सदरचे उपविधी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते त्यास दिनांक ११ मार्च २०१४ रोजी मंजुरी मिळाली आहे.

या ठिकाणी उपरोक्त प्रस्तावनेचा मुख्य उद्देश हा आहे की, मुक्त अर्थव्यवस्था, रिझर्व्ह बँकेचे बदलते पतधोरण व व्यवसायातील स्पर्धा या बाबींचा विचार करता सहकारी बँकांचे अस्तित्व टिकविणे हे फक्त संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या हाती नसून ते आपल्या सारख्या जागृत व क्रियाशील सभासद, संचालक मंडळ व कर्मचारी या त्रयींच्या हाती आहे. त्यातच सभासदांचा जास्तीतजास्त सहभाग हे सरकारला व रिझर्व्ह बँकेला अपेक्षित आहे. सभासदांनी सक्रीय होणे ही सहकाराची, प्रत्येक सहकारी संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी निर्माण झालेली काळाची गरज आहे असे आम्हाला वाटते. व्यावसायिक व्यवस्थापन, व्यावसायीक मार्गदर्शन व व्यावसायीक दृष्टीकोनाची सर्वच सहकारी संस्थांना खरी गरज आहे. आपल्या बँकेचा एकूण व्यवसायाचा व प्रगतीचा आलेख जरी चढता असला तरी निव्वळ ठेवी वाढविणे हे उद्दीष्ट न ठेवता कमी खर्चाच्या ठेवी वाढविणे व चांगली कर्जे वितरीत करणे हे ध्येय अंगिकारणे आवश्यक आहे. अतिवृष्टी-अनावृष्टी, अवकाळी वृष्टी व

गारपिट या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे चलनवाढ रोखणे, महागाई रोखणे हे जसे अवघड कार्य करणे कठीण आहे तसेच दिवसें दिवस नफा मिळविणे कठीण होत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर बँकेने दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर पूर्ण झालेल्या बँकेच्या १६ व्या आर्थिक वर्षात बँकेची उलाढाल रु. ३२.११ कोटींची झाली असून बँकेला रु. ३५.०९ लाखांचा नफा झाला आहे हे आपणास कळवितांना आम्हाला आनंद होत आहे. सर्व सभासदांचे, ठेवीदारांचे सहकार्य संचालक मंडळाला लाभले यामुळेच बँक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे हे निश्चित.

बँकेचा १६ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा – तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करीत आहोत.

बँकेच्या सांपत्तिक स्थितीचा तुलनात्मक तक्ता आपल्या अवलोकनार्थ सादर करीत आहोत.

**तुलनात्मक सांपत्तिक स्थिती** (रु. लाखात)

| ३१-०३-१३ | भांडवल व देणी | ३१-०३-१४ | ३१-०३-१३ | जिंदगी व येणी | ३१-०३-१४ |
|---|---|---|---|---|---|
| १४४.७६ | भाग भांडवल | १५७.७० | २०.७० | रोख | ४४.९८ |
| २७४.३८ | राखीव व इतर निधी | ३१२.४९ | २४०.०३ | बँकांतील शिल्लक | २६३.२२ |
| १,८२९.२० | ठेवी | २,०३५.५४ | ८७१.८० | गुंतवणूक | १,००२.८० |
| ९८.४९ | इतर देणी | ११९.८५ | १,०४७.११ | कर्जे | १,१७६.०० |
| ३३.७७ | नफा | ३५.१३ | २००.९६ | इतर जिंदगी | १७३.७१ |
| २,३८०.६० | | २,६६०.७१ | २,३८०.६० | | २,६६०.७१ |

**भाग भांडवल :-** अहवालसालात बँकेच्या भाग भांडवलात रु. १२.९४ लाखांनी वाढ झाली असून गतवर्षीच्या तुलनेत ही वाढ ८.९४% ने झाली आहे. संचालक मंडळाच्या प्रयत्नाने आणि सर्व सभासदांनी दिलेल्या प्रतिसादामुळेच ही वाढ शक्य झाली आहे. सर्व सभासदांनी यापुढेही असेच सहकार्य करुन भागभांडवल वाढविण्यास मदत करावी ही विनंती.

**सभासद संख्या :-** दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर एकूण सभासद संख्या ५७७० होती. अहवाल सालात १८३ नवीन सभासद झाले असून २९ सभासदांनी सभासदत्वाचे राजीनामे दिले. ३१ मार्च २०१४ अखेर बँकेचे एकूण सभासद ५९२४ आहेत. तसेच नाममात्र सभासदांची संख्या ३८ आहे.

**भांडवल पर्याप्तता (CRAR) :-** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या भांडवल पर्याप्तता धोरणानुसार, भांडवल पर्याप्ततेचे गुणोत्तर प्रमाण ९% राखणे आवश्यक आहे. दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे गुणोत्तर प्रमाण (CRAR) २९.१५% राखले असून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या या निकषाचे बँकेने पालन केलेले आहे.

**राखीव निधी :-** दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर बँकेचा राखीव निधी रु. ४८.५४ लाख होता. दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर त्यात गतवर्षाचा नफा, सन २०१० अखेरचा न नेलेला लाभांश आणि प्रवेश फी अशी एकूण रु. १३.३० लाखांनी वाढ होऊन बँकेचा राखीव निधी रु. ६१.८४ लाख झाला आहे. गतवर्षाच्या तुलनेत राखीव निधीत २७.४०% वाढ झाली आहे.

**इमारत निधी :-** दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर बँकेचा इमारत निधी रु. ६८.०० लाख होता. गतवर्षीच्या नफा विभागणीमुळे रु. ५.२५ लाखांनी वाढ होऊन बँकेचा इमारत निधी रु. ७३.२५ लाख झाला आहे. गतवर्षाच्या तुलनेत इमारत निधीत ७.७२% ने वाढ झाली आहे.

**बुडीत व संशयास्पद कर्ज निधी :-** दि. ३१ मार्च २०१३ अखेर बँकेचा बुडीत व संशयास्पद कर्ज निधी रु. ४४.०० लाख होता. अहवालसालात रु. १.५० लाखांची तरतुद करण्यात आली. त्यामुळे बँकेचा बुडीत व संशयास्पद कर्ज निधी रु. ४५.५० लाख झाला आहे. थकीत कर्जदारांनी आपल्या थकीत कर्जाची रक्कम त्वरीत भरुन बँकेस सहकार्य करावे. तसेच ज्या सभासदांनी बँकेकडून कर्जे घेतली आहेत त्यांनी त्यांच्या कर्जाचे हप्ते नियमित भरुन थकबाकी राहणार नाही याची खबरदारी घ्यावी व बँकेस सहकार्य करावे ही विनंती.

**इतर निधी :-** दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर पूर्ण झालेल्या आर्थिक वर्षात बँकेचे इतर निधी रु. १७.८८ लाख आहेत.

**ठेवी :-** दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर बँकेकडे रु. १,८२९.२० लाखांच्या विविध प्रकारच्या ठेवी होत्या. अहवालसालात ठेवींमध्ये रु. २०६.३४ लाखांनी वाढ झाली असून दि. ३१ मार्च २०१४ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. २,०३५.५४ लाख झाल्या आहेत. गतवर्षाच्या तुलनेत अहवालसाली ठेवींमध्ये ११.२८% नी वाढ झाली आहे.

**ठेव विमा योजना :-** बँकेच्या सर्व ठेवीदारांच्या रुपये एक लाखा पर्यंतच्या ठेवी ''डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरेंटी कार्पोरेशन' यांच्या योजनेखाली सुरक्षित आहेत. ठेवीदारांचे हित लक्षात घेऊन बँकेने विम्याचे हप्ते नियमितपणे भरले आहेत.

**गुंतवणूक :-** दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. ८७१.८० लाख होती. या गुंतवणुकीपैकी रु. ५९२.१२ लाखांची गुंतवणूक सरकारी कर्ज रोख्यांमध्ये केली होती. अहवालसालात सरकारी कर्ज रोख्यांमधील केलेली एकूण गुंतवणूक रु. ७८४.०४ लाखांची असून अन्य गुंतवणूक रु. २१८.७६ लाख आहे. ३१ मार्च २०१४ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. १,००२.८० लाख झाली आहे. गतवर्षाच्या तुलनेत अहवाल वर्षात गुंतवणुकीमध्ये रु. १३१.०० लाखांनी (१५.०३%) वाढ झाली आहे.

**कर्जे :-** दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर बँकेची एकूण येणे कर्जे रु.१,०४७.११ लाखांची होती. अहवाल वर्षात रु. ४४९.३१ लाखांचे कर्ज वाटप केले असून रु. ३२०.४२ लाख कर्जांची वसुली झाली आहे. दि. ३१ मार्च २०१४ अखेर रु. १,१७६.०० लाखांची कर्जे येणे बाकी आहेत. अहवाल वर्षात कर्ज व्यवहारात रु. १२८.८९ लाखांनी वाढ झाली आहे. गतवर्षाच्या तुलनेत अहवालसाली कर्जामध्ये शेकडा १२.३१% नी वाढ झाली आहे.

## प्राधान्य घटक व दुर्बल घटकांना दिलेली कर्जे :-

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ३१ मार्च २०१४ अखेर बँकेने रु. ६३५.०३ लाखांची कर्जे प्राधान्य घटकांना वितरित केली आहेत. प्राधान्य घटकांना दिलेल्या कर्ज रक्कमेचे एकूण कर्ज रक्कमेशी शेकडा प्रमाण ५४.००% आहे. प्राधान्य घटकापैकी रु. १५८.३८ लाखांची कर्जे दुर्बल घटकांना वितरित करण्यात आली आहेत. दुर्बल घटकांना वितरित करण्यात आलेल्या कर्जाचे प्राधान्य घटकांना वितरित केलेल्या कर्जाशी शेकडा प्रमाण २४.९४% आहे तर एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण १३.४७% आहे.

**संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) मधील तरतुदीनुसार संचालक व त्यांच्या नातेवाईक यांना अहवाल वर्षात कर्ज दिलेले नाही. दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर त्यांच्याकडे कर्ज येणे बाकी नाही.

**अनुत्पादित कर्जे एक दृष्टीक्षेप:-** अहवालसालात एकूण अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ५.६७% असून निव्वळ अनुत्पादित कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण १.८०% आहे.

**अनुत्पादित कर्जाचा मागील तीन वर्षाचा तक्ता** (रु. लाखात)

| | ३१.०३.२०१२ | ३१.०३.२०१३ | ३१.०३.२०१४ |
|---|---|---|---|
| मागील वर्षाची अनुत्पादित कर्ज रक्कम | ४४.५० | ६५.५६ | ८१.३७ |
| अहवाल वर्षात केलेली वसुली | ७.३४ | ८.९८ | २५.६३ |
| | **३७.१६** | **५६.५८** | **५५.७४** |
| अहवाल वर्षात अनुत्पादित कर्जात समाविष्ट झालेली कर्जे | २८.४० | २४.७९ | १०.९३ |
| वर्ष अखेर अनुत्पादित कर्जे | **६५.५६** | **८१.३७** | **६६.६७** |
| अनुत्पादित कर्जाची तरतूद | ४४.०० | ४४.०० | ४५.५० |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | **२१.५६** | **३७.३७** | **२१.१७** |
| बँकेची एकूण कर्जे | ९८०.९९ | १०४७.११ | ११७६.०० |
| अनुत्पादित कर्जाचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण | ६.६८% | ७.७७% | ५.६७% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जाचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण | २.१९% | ३.५६% | १.८०% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जाचे निव्वळ कर्जाशी शेकडा प्रमाण | २.३०% | ३.७२% | १.८७% |

## नफा तोटा खाते

**उत्पन्न व खर्चाचे संक्षिप्त विश्लेषण तसेच मागील वर्षातील उत्पन्न व खर्चाशी तुलनात्मक आकडेवारी** (रु. लाखात)

| तपशील | ३१-०३-२०१३ | ३१-०३-२०१४ | अहवाल सालातील वाढ | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मिळालेले व्याज | २११.३४ | २४३.३० | ३१.९६ | १५.१२% |
| दिलेले व्याज | १२१.४८ | १३६.०८ | १४.६० | १२.०१% |
| निव्वळ व्याजाचे उत्पन्न | **८९.८६** | **१०७.२२** | **१७.३६** | **१९.३१%** |
| अन्य उत्पन्न | १८.२६ | १५.०४ | (३.२२) | (१७.६३%) |
| एकूण उत्पन्न | **१०८.१२** | **१२२.२६** | १४.१४ | **१३.०८%** |
| व्यवस्थापन खर्च | ५४.४८ | ६८.९८ | १४.५० | २६.६१% |
| करपूर्व नफा | **५३.६४** | **५३.२८** | **(०.०६)** | **(०.११%)** |
| कर व अन्य तरतुदी | १९.९७ | १८.१९ | (१.४८) | (७.५२%) |
| निव्वळ नफा | **३३.६७** | **३५.०९** | **१.४२** | **४.२१%** |

**नफा विभागणी :-** दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेस रु. ३५,०८,६८०.२६ लाख नफा झाला असून मागील वर्षीचा शिल्लक नफा रु. ४,६०३.४६ मिळविल्यानंतर एकूण निव्वळ नफा रु. ३५,१३,२८३.७२ झाला आहे. नफ्याची विभागणी खालील प्रमाणे करावी अशी संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राखीव निधी (२५%) | रु. | ८,७७,५००.०० |
| २) | लाभांश तरतूद (१२%) शिफारस | रु. | १७,९८,५००.०० |
| ३) | गुंतवणूक घसारा निधी | रु. | ७,००,०००.०० |
| ४) | गुंतवणूक चढउतार निधी | रु. | ३५,०००.०० |
| ५) | निवडणूक निधी | रु. | ५०,०००.०० |
| ६) | शैक्षणिक निधी | रु. | २५,०००.०० |
| ७) | तंत्रज्ञान विकास निधी | रु. | २५,०००.०० |
| ८) | पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | २,२८३.७२ |
| | **एकूण** | रु. | **३५,१३,२८३.७२** |

**संचालक मंडळ :-** बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार यांच्या गरजा लक्षात घेऊन तसेच व्यवसायातील स्पर्धा, सहकार कायदा, भारतीय रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे या सर्वांचा विचार करुन संचालक मंडळाला बँकेचा कारभार करावा लागत असून ग्राहक सेवा चांगली देण्याची सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत.

अहवालसालात बँकेने आय.डी.बी.आय. बँकेच्या परस्पर सहकार्याने डिमांड ड्राफ्ट, RTGS/NEFT या सारख्या सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

सभासद, ठेवीदार, खातेदार यांना अधिकाधीक चांगली सेवा देता यावी यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील असून त्याचा पाठपुरावा संचालक मंडळ करीत आहे.

## संचालक मंडळाच्या मासिक सभा :-

अहवालसाली संचालक मंडळाच्या एकूण १२ मासिक सभा झाल्या. मासिक सभेतील संचालकांची उपस्थिती खालील प्रमाणे

| संचालकाचे नाव | पद | उपस्थिती | संचालकाचे नाव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| श्री. हरिष बा. परब | अध्यक्ष | १० | श्री. शांताराम अ. गोवळकर | संचालक | ११ |
| श्री. वसंत बा. पांचाळ | उपाध्यक्ष | १२ | श्री. गणपत स. पांडलोसकर | संचालक | १२ |
| श्री. ल. वि. तावडे | संचालक | ११ | श्री. रमेश रा. पवार | संचालक | १२ |
| श्री. प्रकाश रा. वराडकर | संचालक | १२ | श्री. श्रीकृष्ण गो. हडकर | संचालक | १२ |
| श्री. मोहन भा. तळेकर | तज्ज्ञ संचालक | १२ | श्री. स्वप्निक सु. फाटक | संचालक | ७ |
| श्री. दिगंबर रा. शिरोडकर | तज्ज्ञ संचालक | ५ | श्री. संभाजी शि. मंडले | संचालक | ११ |
| श्री. जयवंत श्री. नरसाळे | संचालक | ९ | सौ. जयश्री सु. परुळकर | संचालिका | ८ |
| श्री. दिवाकर रा. दळवी | संचालक | १२ | सौ. शामल दि. चव्हाण | संचालिका | ९ |
| श्री. दिनकर हि. तावडे | संचालक | ११ | | | |

अहवालसाली संचालक मंडळाच्या उपसमित्यांच्या एकूण २२ सभा घेण्यात आल्या. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| **कर्ज समिती सभा** | ११ | **लेखापरीक्षण समिती सभा** | ४ |
| **प्रशासन समिती सभा** | ४ | **मालमत्ता व देणी व्यवस्थापन सभा** | ३ |

**भारतीय रिझर्व्ह बँक तपासणी :-** भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकेची दि. ३१ मार्च २०१२ अखेर तपासणी करुन बँकेस ब + ही श्रेणी दिली होती. अहवालसालात बँकेची भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत तपासणी झालेली नाही.

**वैधानिक लेखापरीक्षण :-** दिनांक ०२-०८-२०१३ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेने शासनाने प्रसिद्ध केलेल्या नामिकेमधुन मे. शिंदे अॅन्ड नायक असोसिएटस् यांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक केली होती. त्यांनी दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम पूर्ण केले असून त्यांनी अहवालसाली बँकेला **'अ'** वर्ग दिला आहे.

**अंतर्गत लेखापरीक्षण :-** सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम मे. एस्. एस्. राणे अॅन्ड कंपनी, चार्टर्ड अकाउन्टट् यांनी केले असून त्यांचा लेखापरीक्षण अहवाल बँकेस सादर केला आहे.

**विद्यार्थी गुणगौरव सोहळा :** - अहवालसालात बँकेने शैक्षणिक, क्रीडा व विशेष नैपुण्य प्राप्त सभासद पाल्यांचा गुणगौरव समारंभ शनिवार दि. २६-१०-२०१३ रोजी सायं. ५.०० वाजता शिशुविकास सभागृह, डॉ. शिरोडकर हायस्कूल, परळ, मुंबई - ४०० ०१२ येथे आयोजित केला होता. या समारंभास इतिहास संशोधन मंडळ पुणे आणि इंडियन हिस्ट्री काँग्रेस या संस्थेचे आजिव सदस्य प्राचार्य माननीय श्री. लक्ष्मण दा. गोलतकर यांना आमंत्रीत करण्यात आले होते. यांचे हस्ते एकूण ४१ पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

**श्रध्दांजली :-** अहवाल सालात दिवंगत झालेल्या ज्ञात-अज्ञात सभासद, खातेदार, ठेवीदार आणि हितचिंतक यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत, तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सर्व सभासद, खातेदार, हितचिंतक व संचालक मंडळ सहभागी आहे.

**ऋण निर्देश :-** स्थानिक विद्यमान आमदार मा. श्री. बाळा नांदगावकर, माजी आमदार मा. श्री. दगडू सकपाळ, विद्यमान नगरसेवक मा. श्री. नाना आंबोले, भारतीय रिझर्व्ह बँक, शहरी बँक विभाग आणि नागरी बँक विभागाचे अधिकारी, माननीय सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे, माननीय विभागीय सहनिबंधक (प्रशासन व लेखापरीक्षण विभाग) सहकारी संस्था, मुंबई विभाग, माननीय श्री. चंद्रकांत वि. टिकुले जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई (१) शहर, तसेच सर्व उपनिबंधक सहकारी संस्था व त्यांचे सहकारी, मा. विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक असोसिएशन लिमिटेड मुंबई, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लिमिटेड, विश्वस्त व पदाधिकारी डॉ. शिरोडकर हायस्कूल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक काळाचौकी पोलीस ठाणे व त्यांचे सहकारी, वैधानिक, अंतर्गत, सतत व समवर्ती लेखापरीक्षक या सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

त्याच प्रमाणे बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार व हितचिंतक यांनी बँकेप्रती व्यक्त केलेला विश्वास व दिलेल्या सहकार्यामुळेच अहवाल काळात संचालक मंडळाला प्रगती साधता आली यामुळे त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. यापुढे देखील सर्व सभासद, ठेवीदार आणि खातेदार संचालक मंडळाला सहकार्य करतील अशी आम्हास खात्री आहे. बँकेचे अधिकारी व सर्व कर्मचारी वर्ग यांनी समर्पणाच्या भावनेतून केलेल्या अविरत सेवेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच अनेक व्यक्ती व संस्थांनी वेळोवेळी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

संचालक मंडळाच्यावतीने

**मुंबई :** **हरिष बा. परब**

**दिनांक : ३०-०६-२०१४** अध्यक्ष

## भांडवल पर्याप्तता :- तुलनात्मक तक्ता

(रु. लाखात)

| तपशील | ३१.०३.२०१३ | ३१.०३.२०१४ |
|---|---|---|
| **१) स्वनिधी प्रथम भाग** | | |
| अ) वसूल भाग भांडवल | १४४.७६ | १५७.७० |
| ब) राखीव निधी व अतिरिक्त शिल्लक | | |
| वैधानिक निधी | ४८.५४ | ६१.८४ |
| इमारत निधी | ६८.०० | ७३.२५ |
| नफा | ३३.६७ | ३५.०९ |
| वजा तरतूद | ०.०० | १७.९९ |
| एकूण निधी (ब) | **१५०.२१** | **१५२.१९** |
| **एकूण निधी (अ + ब)** | **२९४.९७** | **३०९.८९** |
| **२) स्वनिधी द्वितीय भाग** | | |
| अन्य निधी | ९.५४ | १२.५३ |
| उत्पादित कर्जांसाठी केलेली सर्वसामान्य तरतूद | २.५२ | २.८० |
| गुंतवणूक चढउतार निधी | २.०५ | २.५५ |
| | **१४.११** | **१७.८८** |
| **एकूण निधी (१ + २)** | **३०९.०८** | **३२७.७७** |
| **जोखीम मालमत्ता** | | |
| स्वनिधीचे जोखीम मालमत्तेशी शेकडा प्रमाण | **२९.७८%** | **२९.१५%** |

## आर्थिक स्थिती :- तुलनात्मक तक्ता

(रु. लाखात)

| | **३१.०३.२०१२** | **३१.०३.२०१३** | **३१.०३.२०१४** |
|---|---|---|---|
| बँकेच्या ठेवी | १५५४.४३ | १८२९.२० | २०३५.५४ |
| बँकेची कर्जे | ९८०.९९ | १०४७.११ | ११७६.०० |
| बँकेचा एकूण व्यवसाय | २५३५.४२ | २८७६.३१ | ३२११.५४ |
| बँकेची कर्जे व ठेवी यांचे गुणोत्तर प्रमाण (सी.डी.रेश्यो) | ६३.११ % | ५७.२४ % | ५७.७७ % |
| बँकेचे एकूण कर्मचारी | १२ | १२ | १४ |
| व्यवसाय प्रती कर्मचारी | २११.२८ | २३९.६९ | २२९.४० |
| बँकेचा वर्षाअखेर नफा | ३५.१३ | ३३.६७ | ३५.०९ |
| प्रती कर्मचारी नफा | २.९३ | २.८१ | २.५१ |
| खेळते भांडवल | १९३६.५० | २२५९.९० | २५२७.२२ |
| कर्मचारी खर्च | २१.४८ | २३.९७ | २८.९९ |
| कर्मचारी खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | १.११ | १.०६ | १.१५ |
| बँकेचे निव्वळ मालमत्ता मूल्य | २५१.७३ | ३०६.६५ | ३२७.७७ |

# बँकेच्या प्रगतीचा तक्ता

| तपशील | भाग | राखीव निधी | ठेवी | कर्जे | गुंतवणूक | एकूण उत्पन्न | एकूण खर्च | निव्वळ नफा | खेळते भांडवल | एकूण सभासद | एकूण कर्मचारी | लाभांश | लेखा परिक्षण वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | १५७.७० | ६१.८४ | २०३५.५४ | ११७६.०० | १००२.८० | २५८.३४ | २२३.२५ | ३५.०९ | २५२७.२२ | ५९२४ | १४ | १२% शिफारस | अ |
| २०१३ | १४४.७६ | ४८.५४ | १८२९.२० | १०४७.११ | ८७१.८० | २२९.६० | १९५.९३ | ३३.६७ | २२५९.९० | ५७७० | १२ | १२% | अ |
| २०१२ | १३०.०३ | ३४.२४ | १५५४.४३ | ९८०.९९ | ६५०.३१ | १९२.३७ | १५७.२३ | ३५.१४ | १९३६.५० | ५६३० | १२ | १२% | अ |
| २०११ | ११६.०४ | २३.२० | १३८७.६२ | ८४८.११ | ५९३.७४ | १५१.८७ | ११९.७५ | ३२.१२ | १७२८.६९ | ५४०७ | १२ | १२% | अ |
| २०१० | १०१.०२ | १७.३२ | १०९२.७६ | ६६८.८६ | ४८५.७४ | ११८.२१ | ९४.७६ | २३.४५ | १३७७.४४ | ५१३८ | १२ | १२% | अ |
| २००९ | ८५.२५ | ११.७९ | ७७३.२९ | ५१७.०८ | ३३६.७५ | १०२.४२ | ८०.३७ | २२.०५ | १०३७.७० | ४८८५ | १२ | १०% | अ |
| २००८ | ८०.९३ | ८.६६ | ६३६.१४ | ४३२.४३ | २८६.७५ | ८९.६५ | ५५.५० | ३४.१५ | ८४३.१९ | ४७४३ | ९ | ७% | अ |
| २००७ | ७७.३९ | ८.६४ | ५२६.८० | ३७२.०० | २७४.१४ | ५७.९० | ५०.७४ | ७.१६ | ७०१.०६ | ४५४५ | ८ | -- | क |
| २००६ | ७७.९८ | ८.५७ | ५०२.४७ | २८४.७३ | ३२३.१८ | ६६.६५ | ६४.२६ | २.३९ | ६६९.५१ | ४३६१ | ८ | -- | क |
| २००५ | ८४.५८ | ८.३२ | ५४६.२५ | ३०९.८८ | ३७६.६८ | ६४.२८ | ९५.८१ | -३१.५१ | ७५१.३२ | ४२०१ | ११ | -- | क |
| २००४ | ९२.८५ | ७.७७ | ५६४.८८ | ३९६.८२ | ३१५.४२ | ८८.२३ | ८६.३६ | १.८८ | ७३२.३२ | ४३१२ | १२ | -- | क |
| २००३ | ९४.४१ | ३.१२ | ६२५.१६ | ३८६.८० | ३५०.४२ | ८६.६० | ७२.३८ | १४.२२ | ८०९.२३ | ४३०९ | १२ | -- | क |
| २००२ | ८८.३० | ३.०६ | ५०४.६० | ३५९.६७ | २२५.४४ | ७५.२६ | ८३.२१ | -७.९५ | ६८१.३८ | ४११३ | १३ | -- | अ |
| २००१ | ८५.०६ | १.१८ | ३८१.६२ | २८६.२० | १५५.२५ | ५७.६० | ५०.४२ | ७.१८ | ५११.७७ | ३९४० | ११ | ६% | अ |
| २००० | ७६.७६ | ०.६३ | २०४.५१ | १४९.०० | ९९.२५ | ३४.७७ | ३०.५८ | ४.१९ | २९६.२८ | ३७३० | १२ | -- | अ |

# INTERNAL AUDITOR'S REPORT

We have audited the attached Balance Sheet of ***SINDHUDURG SAHAKARI BANK LTD.,*** as at 31st March, 2014 and also the foregoing Profit & Loss Account of the Bank for the year ended upto that date in which are incorporated the returns of *Head Office & Branch* audited by us. These financial Statements are the responsiblility of the bank's Management. Our resposibility is to express an opinion on these financial statements based on our audit.

We conducted our Audit in accordance with auditing standards generally accepted in India. Those Standards require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An Audit includes, examining on test basis, evidences supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by management, as well as evaluating the overall financial statement presentaion. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

Further to our above comments and subjects to the scope of our audit as laid down by the members we report that.

1. We have obtained all the information and explanation which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit.
2. In our opinion, Proper books of account as required by the Act, Rules and Bye-laws of the Bank have been kept by the Bank, so far as appears from our examination of the books.
3. The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank.
4. In our opinion, and to the best of our infromation and according to the explanations given to us, the accounts read with the notes thereon including Significant Accounting Policies mentioned therein, give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view :-
   a) In the case of Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31st March, 2014 and
   b) In the case of the Profit and Loss Account, of the profit for the year ended on the date.

**For S. S. Rane & Co.**
Chartered Accountants
Sd/-
**(Sanjay Rane)**

Date : 04-06-2014
Place : Mumbai

# M/s. Shinde Nayak & Associates,

CHARTERED ACCOUNTANTS

Firm Reg. No. 119906W

## STATUTORY AUDITOR'S REPORT

To,
The Members,
Sindhudurg Co-operative Bank Limited
Mumbai - 400 012.

*Report on Financial Statements*

1) We have audited the accompanying Financial Statements of **"SINDHUDURG CO-OPERATIVE BANK LIMITED"**, Mumbai which comprise the Balance Sheet as at 31st March 2014 and Profit and Loss account for the year ended on that date and other explanatory information.

*Management's Responsibility for the Financial Statements :*

2) Management of the Bank is responsible for the preparation of these Financial Statements that give true and fair view of the financial position and financial performance of the Bank in accordance with the Banking Regulation Act, 1949, Banking Laws (Applicable to Co-operative Societies) Act 1965 and MCS Act 1960 and MCS Rules 1961. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation and fair presentation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

*Auditors' Responsibility :*

3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement.

4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The Procedures selected depend on the auditor's judgments, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the entity's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are apprpriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our Audit opinion.
6. We report short provision in depreciation on investments under AFS category by Rs. 7.01 lacs as on 31-03-2014. The profit is overstated to that extent.

*Opinion*

7. Subject to remarks in para '6' above, and to the best of our information and according to the explanation given to us, read with the Notes to the accounts, in our opinion, the financial statements give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India :
   (a) in the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at March 31, 2014; and
   (b) in the case of Profit and Loss Acccount, of the Profit for the year ended on that date;

   *Report on Other Legal and Regulatory Requirements*

8. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in accordane with Section 31 of the Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co-operative societies);
9. Subject to the limitations of the audit as indicated in Paragraphs 3 to 6 above, we report that :
   a. We have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of the audit and have found them to be satisfactory.
   b. The transactions of the bank which have come to our notice have been within the powers of the Bank.
   c. The returns received from the branch offices of the bank have been found adequate for the purpose of the Audit.
10. We further report that :
   a. the Balance Sheet and Profit and Loss account dealt with by this report are in agreement with the books of account and retuns;
   b. in our opinion, proper books of accounts as required by The Maharashtra State Co-operative Societies Act, 1960. MCS Rules, 1961 and as required by the Byelaws have been kept by the bank so far as appears from our examination of those books.

For **Shinde Nayak & Associates,**
**Chartered Accountant**
**Firm Reg. No. 119906W**

**(CA L. V. Nayak)**
**Partner**
**M. No. 104221**

**Place : Mumbai**
**Date : 19-06-2014**

# सन २०१४-२०१५ चे महसुली व भांडवली अंदाज पत्रक

(रु. लाखात)

| जमा | २०१३-१४ अंदाज | २०१३-१४ पूर्तता | २०१४-१५ अंदाज | नावे | २०१३-१४ अंदाज | २०१३-१४ पूर्तता | २०१४-१५ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | १७५.०० | १६८.३२ | २०२.०० | ठेवीवरील व्याज | १५०.०० | १३६.०८ | १६०.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ८५.०० | ७४.९८ | ७८.०० | कर्मचारी पगार | २८.०० | २८.९९ | ३१.५० |
| इतर जमा | २३.०० | १५.०४ | २०.०० | आस्थापना खर्च | ३५.०० | ३६.७४ | ३६.०० |
| बुडीत व संशयित कर्ज निधी अधिकतम तरतूद | | | | घसारा | ३.०० | ३.५३ | ३.५० |
| | | | | आयकर | २२.०० | १७.९१ | २२.०० |
| | | | | निव्वळ नफा | ४५.०० | ३५.०९ | ४७.०० |
| | | | | | | | |
| **एकूण** | **२८३.००** | **२५८.३४** | **३००.००** | **एकूण** | **२८३.००** | **२५८.३४** | **३००.००** |

| देणे | २०१३-१४ अंदाज | २०१३-१४ पूर्तता | २०१४-१५ अंदाज | येणे | २०१३-१४ अंदाज | २०१३-१४ पूर्तता | २०१४-१५ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भागभांडवल २८०.०० | १५०.०० | १५७.७० | १७०.०० | रोख व बँकांतील शिल्लक | २५०.०० | ३०८.२० | २८०.०० |
| राखीव व इतर निधी | ३१५.०० | ३१६.१९ | ३७१.५० | गुंतवणूक | ९५०.०० | १००२.८० | १०००.०० |
| ठेवी | २१००.०० | २०३५.५४ | २३००.०० | कर्जे | १३५०.०० | ११७६.०० | १५५०.०० |
| देणे व्याज | ५०.०० | ३५.९३ | ४८.०० | येणे व्याज | १३०.०० | १२५.१२ | १३५.०० |
| इतर देणी | ७५.०० | ८०.२२ | ८०.०० | स्थावर मालमत्ता | १५.०० | २३.४५ | २१.५० |
| | | | | इतर येणी | ४०.०० | २५.१४ | ३०.०० |
| नफा | ४५.०० | ३५.१३ | ४७.०० | | | | |
| **एकूण** | **२७३५.००** | **२६६०.७१** | **३०१६.५०** | **एकूण** | **२७३५.००** | **२६६०.७१** | **३०१६.५०** |

| ३१-०३-२०१३ | खर्च | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| | **१) दिलेले व्याज** | | |
| | अ) ठेवींवरील | | |
| १७,२०,८९४.०० | मुदत ठेवींवर | १,११,९१,५७७.०० | |
| ४,४१,४९६.०० | आवर्त ठेवींवर | ३,९६,०६०.०० | |
| १८,६३,९९४.०० | बचत ठेवींवर | १८,७४,१७७.०० | |
| १,२१,९१२.०० | दैनंदिन ठेवींवर | १,४६,३५३.०० | १,३६,०८,१६७.०० |
| | ब) अधिकर्ष व्याज | | १,९२८.०० |
| | **२) कर्मचारी पगार व भत्ते** | | |
| २३,९६,६५२.०० | पगार | | २८,९९,२३९.०० |
| | **३) भाडे, कर, विमा, दिवाबत्ती व इतर** | | |
| ४,५५,०००.०० | भाडे | ६,०८,५००.०० | |
| ६९,७८४.०० | विमा | ३१,९२८.०० | |
| २,२८,१३३.०० | दिवाबत्ती | २,६५,४४७.०० | ९,०५,८७५.०० |
| २८,२३९.०० | **४) कायदे सल्लागार शुल्क** | | ४६,७५०.०० |
| | **५) टपाल व दूरध्वनी** | | |
| ५३,७२५.०० | टपाल | ३६,१८२.०० | |
| ७१,४८०.०० | दूरध्वनी | ८७,३७६.०० | १,२३,५५८.०० |
| | **६) लेखन सामग्री, छपाई व जाहिरात** | | |
| १,३०,१०७.०० | लेखन सामग्री व छपाई | १,९७,६७६.०० | |
| ८२,००२.०० | जाहिरात | ८०,१२०.०० | २,७७,७९६.०० |
| | **७) लेखापरीक्षण शुल्क** | | |
| ९०,०००.०० | सरकारी लेखापरीक्षण | १,३२,५३२.०० | |
| १,१६,०००.०० | अंतर्गत लेखापरीक्षण | १,१३,०००.०० | |
| -- -- | संगणक लेखापरीक्षण | १५,०००.०० | २,६०,५३२.०० |
| | **८) घसारा व दुरुस्ती** | | |
| ४०,०००.०० | घसारा - फर्निचर व फिक्स्चर | ७५,३९४.०० | |
| १,६७,७६९.०० | घसारा - संगणक | २,२५,४६८.०० | |
| ३०,०००.०० | घसारा - कार्यालयीन सामग्री | २९,९५३.०० | |
| १,६००.०० | घसारा - जोडणी | २२,५८६.०० | ३,५३,४०१.०० |
| **१,६१,०८,७८७.००** | **पुढील पानावर** | | **१,८४,७७,२४६.००** |

# मुंबई ४०० ०१२.

## कालावधीचे नफा-तोटा पत्रक

| ३१-०३-२०१३ | उत्पन्न | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| | **१) मिळालेले व्याज** | | |
| १,४९,२४,२८३.०३ | अ) कर्ज व आगाऊ रक्कमेवरील | | १,६८,३१,९३८.३३ |
| | ब) गुंतवणुकीवरील व्याज | | |
| २३,०९,७१६.०० | कायम ठेव | १४,७०,५८३.६० | |
| ३१७.०० | बचत ठेवीवर | ८९४.०० | |
| ३८,९९,९७२.०१ | सरकारी कर्ज रोख्यावरील व्याज | ६०,२६,२६७.७२ | ७४,९७,७४५.३२ |
| ७५,४२८.०८ | **२) बँक कमिशन व विनिमय** | | ८५,९३९.७३ |
| | **३) इतर जमा** | | |
| ६०.०० | लाभांश | १३०.०० | |
| ४,१९,१७६.८५ | इन्सिडंटल चार्जेस | २,३७,९५५.०८ | |
| ६,५७०.०० | कर्ज अर्ज विक्री | ६,७६५.०० | |
| २,६८,४९४.०० | सर्व्हिस चार्जेस | ७३,५०७.०० | |
| ५३,७०५.५० | चेकबुक चार्जेस | ५२,२७०.०० | |
| ४२,५०७.०० | नोटीस चार्जेस | ५६,३३७.०० | |
| १,९८,८१६.०१ | चेक रिटर्न चार्जेस | २,२८,८८२.८९ | |
| ७५०.०० | पासबुक चार्जेस | १५०.०० | |
| २,५९,४४८.०० | प्रोसेसिंग फी | २,४०,८२२.०० | |
| २१,५५८.०० | अतिरिक्त लाभांश तरतूद | २३,४७८.०० | |
| ४,५६,५००.०० | सरकारी कर्ज रोख्यावरील नफा | ४,९८,०००.०० | |
| २२,५००.०० | लीगल चार्जेस | -- -- | १४,१८,२९६.९७ |
| २,२९,५९,८०१.४८ | **पुढील पानावर** | | २,५८,३३,९२०.३५ |

| ३१-०३-२०१३ | खर्च | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| १,६१,०८,७८७.०० | **मागील पानावरुन** | | १,८४,७७,२४६.०० |
| | **९) इतर खर्च** | | |
| १,७८,४७६.०० | ठेव विमा योजना | २,२९,१४९.०० | |
| १,८९,७१३.०० | सर्वसाधारण सभा खर्च | २,७०,०५१.०० | |
| ९,६७१.०० | संचालक सभा खर्च | ७,४२६.०० | |
| १,४१,१३७.०० | प्रवास खर्च | १,५८,१०५.०० | |
| १,६१,४९५.०० | किरकोळ खर्च | १,५९,७९६.०० | |
| २,०८,८९२.५९ | समाशोधन खर्च | २,२५,९४८.४१ | |
| ९,२२५.०० | साफसफाई खर्च | १०,६५०.०० | |
| ११,२४७.०० | वर्गणी | ४३,७३७.०० | |
| १,४९,२६५.०० | दैनंदिन ठेव कमिशन | १,६१,५७८.०० | |
| १६,२००.०० | ट्रेनिंग व सेमीनार | ५००.०० | |
| २,१३,०२२.०० | दुरुस्ती खर्च | ३,२९,२१७.०० | |
| ५७,३००.०० | संचालक सभा भत्ता | ५६,४००.०० | |
| ७९२.०० | कर्मचारी वेल्फेअर फंड | ८६४.०० | |
| ३०,०००.०० | शिक्षण निधी | -- -- | |
| ८५,३६२.०० | सण व सत्कार खर्च | १,४२,५४०.०० | |
| ६,७००.०० | आर. टी. ओ. चार्जेस | -- -- | |
| -- -- | प्रोफेशनल चार्जेस | ४७,४६९.०० | |
| ४,०००.०० | वेबसाईट चार्जेस | ४,२००.०० | |
| ४,५००.०० | लॉकर भाडे | -- -- | |
| ११,०००.०० | महानगर पालिका परवाना शुल्क | -- -- | |
| २२,८५२.४९ | इतर खर्च | २२,१४०.६८ | |
| ६,०००.० | वसूली खर्च | ९,०००.०० | १८,७८,७७१.०९ |
| | **१०) आयकर** | | |
| ३,१७,१३०.०० | २०११-२०१२ | ४१,२२३.०० | |
| १६,५०,०००.०० | २०१२-२०१३ | १७,५०,०००.०० | १७,९१,२२३.०० |
| | **११) म. स. संस्था अधिनियम १९६० कलम ६५ (१) प्रमाणे तरतुदी** | | |
| -- -- | बुडीत व संशयीत कर्ज निधी तरतूद | १,५०,०००.०० | |
| -- -- | उत्पादित जिंदगी तरतूद | २८,०००.०० | १,७८,०००.०० |
| ३३,६७,०३४.४० | **१२) निव्वळ नफा** | | ३५,०८,६८०.२६ |
| **२,२९,५९,८०१.४८** | **एकूण** | | **२,५८,३३,९२०.३५** |

आमच्या आजमितीस अहवालाप्रमाणे

सही/-

**एल्. व्ही. नायक**

करिता मे. शिंदे नायक ॲन्ड असोसिएटस्

सनदी लेखापाल

संस्था नोंदणी क्र. ११९९०६ डब्ल्यू.

मुंबई

दिनांक : १९-०६-२०१४

# मुंबई ४०० ०१२.

कालावधीचे नफा-तोटा पत्रक

| ३१-०३-२०१३ | उत्पन्न | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| २,२९,५९,८०१.४८ | मागील पानावरुन | | २,५८,३३,९२०.३५ |
| २,२९,५९,८०१.४८ | एकूण | | २,५८,३३,९२०.३५ |

**श्री. वसंत बा. पांचाळ**
उपाध्यक्ष

**श्री. हरिष बा. परब**
अध्यक्ष

**श्री. अ. व. प्रभुदेसाई**
मुख्य कार्यकारी अधिकारी

| ३१-०३-२०१३ | भांडवल व देणी | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| | **१) भाग भांडवल** | | |
| | **अधिकृत भांडवल** | | |
| १०,००,००,०००.०० | (४०,००,००० भाग प्रत्येकी रु. २५/- प्रमाणे) | | १०,००,००,०००.०० |
| | **वसूल भाग भांडवल** | | |
| १,४४,७६,४२५.०० | (६,३०,८१० भाग प्रत्येकी रु. २५/- प्रमाणे) | | १,५७,७०,२५०.०० |
| | **२) राखीव व इतर निधी** | | |
| ४८,५४,१७०.०० | गंगाजळी | ६१,८३,६९७.०० | |
| ६८,००,०००.०० | इमारत निधी | ७३,२५,०००.०० | |
| ४४,००,०००.०० | बुडीत व संशयास्पद कर्ज निधी | ४५,५०,०००.०० | |
| २,०९,०८५.०० | सभासद कल्याण निधी | २,५९,०८५.०० | |
| १५,०००.०० | धर्मादाय निधी | ४०,०००.०० | |
| २,६५,०००.०० | गुंतवणूक घसारा निधी | ३,४०,०००.०० | |
| २,५२,०००.०० | उत्तम जिंदगी तरतूद | २,८०,०००.०० | |
| २,०५,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | २,५५,०००.०० | |
| १,६५,०००.०० | कर्मचारी कल्याण निधी | २,१४,१३६.०० | |
| ३,००,०००.०० | लाभांश समकरण निधी | ४,००,०००.०० | |
| २,६०,०००.०० | ग्रॅच्यूईटी | ३,७०,०००.०० | २,०२,१६,९१८.०० |
| | **३) ठेवी** | | |
| १०,९७,९५,०९९.०० | अ) मुदत ठेव | १२,५३,९५,२७८.०० | |
| ५,२०,२०,५५३.१५ | ब) बचत ठेव | ५,९४,३५,४६५.४९ | |
| १,३२,४६,६२३.३९ | क) चालू ठेव | १,०५,६४,१३६.५७ | |
| ५२,०९,३८६.०० | ड) आवर्त ठेव | ५०,५८,८४१.०० | |
| २६,४८,३६०.०० | इ) दैनंदिन ठेव | ३१,००,०९०.०० | २०,३५,५३,८११.०६ |
| २,५०,०००.०० | **४) वसुलीसाठी आलेली बिले** (उलट बाजू प्रमाणे) | | -- -- |
| | **५) देणे व्याज** | | |
| ३२,७४,००६.०० | मुदत ठेव | | ३५,९२,६१७.०० |
| **२१,८६,४५,७०७.५४** | **पुढील पानावर** | | **२४,३१,३३,५९६.०६** |

# मुंबई ४०० ०१२.

**अखेरचे ताळेबंद पत्रक**

| ३१-०३-२०१३ | मालमत्ता व येणी | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| २०,७०,४३५.०० | **१) रोख शिल्लक** | | ४४,९७,९८२.०० |
| | **२) बँकांतील शिल्लक** | | |
| | **अ) चालू खाती** | | |
| १८,४६१.७० | म.रा.स. बँक लि., लालबाग शाखा | १८,४६१.७० | |
| ५७,०२,४६०.१२ | म.रा.स. बँक लि., फोर्ट शाखा | ३०,६४,००१.३६ | |
| १,५४,४४०.१० | मुं. जि. म. स. बँक लि., लालबाग शाखा | ६,८०,०६५.१० | |
| ४,१२५.०० | मुं. जि. म. स. बँक लि., फोर्ट शाखा | ४,१२५.०० | |
| १,६२,५२,०३२.४१ | मुं. जि. म. स. बँक लि., फोर्ट शाखा (ओ.डी.) | १,७१,२९,४३०.९४ | |
| १८,५८,११३.९४ | एच. डी. एफ. सी. बँक लि. | ४,२२,९२९.४४ | |
| -- -- | आय. डी. बी. आय. बँक | ४९,८९,३९६.२४ | २,६३,०८,४०९.७८ |
| | **ब) बचत खाते** | | |
| १२,९१७.४१ | म. रा. स. बँक लि. लालबाग शाखा | १३,८११.४१ | १३,८११.४१ |
| | **३) गुंतवणूक** | | |
| ५,९२,१२,५००.०० | **अ) शासकीय रोखे पुस्तकी किंमत** | ७,८४,०४,०००.०० | |
| | दर्शनी किंमत ८,००,००,०००.०० | | |
| | बाजारी किंमत ७,५०,९२,२५०.०० | | |
| | **ब) सहकारी संस्थाची भाग पत्रे** | | |
| १,०००.०० | म. रा. स. बँक लि. | १,०००.०० | |
| १,०००.०० | मुं. जि. म. स. बँक लि. | १,०००.०० | |
| | **क) मुदतीच्या ठेवी** | | |
| ६४,५३,७९०.०० | मुं. जि. म. स. बँक लि. फोर्ट शाखा | ७६,४४,५७४.०० | |
| ६२,८२,३५९.०० | मुं. जि. म. स. बँक लि., लालबाग शाखा | ६६,०६,३४३.०० | |
| २५,००,०००.०० | मुं. जि. म. स. बँक लि., ना. म. जोशी मार्ग | २८,००,०००.०० | |
| १,०१,२७,३०७.०० | म. रा. स. बँक लि. फोर्ट शाखा | -- -- | |
| २५,००,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक | -- -- | |
| -- -- | आय. डी. बी. आय. बँक | ४७,००,०००.०० | |
| १,०१,९६२.०० | महानगर को-ऑप. बँक लि., लालबाग शाखा | १,२३,१७३.६० | १०,०२,८०,०९०.६० |
| | **४) कर्जे** | | |
| | **अ) अल्प मुदतीची कर्जे** | | |
| २,२३,६७,९२८.४१ | रोखपत २,३१,०५,७८३.२९ | | |
| १,६१,५८,०४३.१७ | अधिकर्ष १,९०,२३,८४०.४२ | | |
| १,०२,६६,५९१.०० | सोने १,१७,०६,१६८.०० | | |
| ६६,४९,८७४.०० | कायम ठेव, रा.ब.पत्रे, दै. ठेव १,०९,८०,२०८.०० | | |
| २७,०७,०७२.०० | आयुर्विमा पत्रे २३,८९,२४८.०० | ६,७२,०५,२४७.७१ | |
| **१७,१४,०२,४१२.२६** | **पुढील पानावर** | **६,७२,०५,२४७.७१** | **१३,११,००,२९३.७९** |

| ३१-०३-२०१३ | भांडवल व देणी | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| २१,८६,४५,७०७.५४ | **मागील पानावरुन...** | | २४,३१,३३,५९६.०६ |
| ९९,७२,९६२.५६ | **६) थकीत व्याज निधी** | | १,१४,०१,६६५.५६ |
| | **७) इतर देणी** | | |
| १९,९३,३७९.०० | लाभांश | २४,६६,१०१.०० | |
| ४,०२,४८०.०० | पे ऑर्डर | ७,३२,३३५.०० | |
| ९३,५९२.०० | वैधानिक लेखापरीक्षण शुल्क | १,२५,०००.०० | |
| १,३४,१९४.०० | अंतर्गत लेखापरीक्षण शुल्क | १,६७,६४९.०० | |
| २,५०५.०० | सभासदत्वासाठी अनामत | १०,६००.०० | |
| ७,६९,१९६.०० | प्रॉव्हिडंट फंड | १०.०९,९३४.०० | |
| ३०,०००.०० | शिक्षण निधी | २०,०००.०० | |
| ७,९२,५०७.०० | इतर देणे | १५,४४,०५७.०५ | ६०,७५,६७६.०५ |
| | **८) आयकर तरतूद** | | |
| १६,५०,०००.०० | अ) सन २०१२-१३ आयकर तरतूद | १७,५०,०००.०० | |
| १,९६,८५६.०० | ब) सन २००८-०९ आयकर जादा तरतूद | १,९६,८५६.०० | १९,४६,८५६.०० |
| | **९) नफा तोटा खाते** | | |
| ३३,६७,०३४.४० | सन २०१३-१४ चा निव्वळ नफा | ३५,०८,६८०.२६ | |
| ९,६१९.०६ | जमा - मागील वर्षाचा शिल्लक नफा | ४,६०३.४६ | ३५,१३,२८३.७२ |
| २३,८०,६०,०३२.५६ | **पुढील पानावर** | | २६,६०,७१,०७७.३९ |

| ३१-०३-२०१३ | मालमत्ता व येणी | | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|---|
| १७,१४,०२,४१२.२६ | मागील पानावरुन... | | ६,७२,०५,२४७.७१ | १३,११,००,२९३.७९ |
| | **ब) मध्यम मुदतीची कर्जे** | | | |
| ३,२२,६२२.०० | जमीनजुमला | २,१९,२८२.०० | | |
| १,८१,१०,७२६.०० | व्यापार व उद्योगधंदा | १,४६,३०,५००.०० | | |
| २९,०१,८२७.०० | वाहन तारण | २१,०८,३७८.०० | | |
| ९,०६,५८५.०० | गृहपयोगी वस्तू | ८,४४,१६६.०० | | |
| ७९,९४,५०३.०० | वैयक्तिक, कर्मचारी कर्जे | १,४०,४०,८४६.०० | | |
| -- -- | घर दुरुस्ती कर्जे | ३,०१,०००.०० | | |
| -- -- | गहाण कर्जे | २९,०३,७४९.०० | ३,५०,४७,९२१.०० | |
| | **क) दीर्घ मुदतीची कर्जे** | | | |
| १,६३,२५,४९८.०० | गृह कर्जे | | १,५३,४६,३३५.०० | ११,७५,९९,५०३.७१ |
| | **५) येणे व्याज** | | | |
| ९९,७२,९६२.५६ | अ) अनुत्पादित कर्जावरील | | १,१४,०१,६६५.५६ | |
| १८,३४,९९३.२५ | ब) गुंतवणुकीवरील | | ११,१०,६१६.३३ | १,२५,१२,२८१.८९ |
| २,५०,०००.०० | **६) वसुलीसाठी आलेली बिले** (उलट बाजू प्रमाणे) | | | -- -- |
| | **७) स्थावर मालमत्ता** | | | |
| ३,५७,५१०.०० | अ) फर्निचर | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,५७,५१०.०० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ११,५१,४८५.५० | | |
| | | १५,०८,९९५.५० | | |
| | वजा : घसारा | ७५,३९४.०० | १४,३३,६०१.५० | |
| | **ब) संगणक** | | | |
| ३,४०,२०७.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,४०,२०७.०० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ३,५८,८१२.०० | | |
| | | ६,९९,०१९.०० | | |
| | वजा : घसारा | २,२५,४६८.०० | ४,७३,५५१.०० | |
| २३,०७,१९,८४६.०७ | पुढील पानावर | | १९,०७,१५२.५० | २६,१२,१२,०७९.३९ |

| ३१-०३-२०१३ | भांडवल व देणी | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|
| २३,८०,६०,०३२.५६ | मागील पानावरुन... | | २६,६०,७१,०७७.३९ |
| २३,८०,६०,०३२.५६ | एकूण | | २६,६०,७१,०७७.३९ |

आमच्या आजमितीस अहवालाप्रमाणे

सही/-

**एल्. व्ही. नायक**

करिता मे. शिंदे नायक अॅन्ड असोसिएटस्

सनदी लेखापाल

संस्था नोंदणी क्र. ११९९०६ डब्ल्यू.

मुंबई

दिनांक : १९-०६-२०१४

अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१-०३-२०१३ | मालमत्ता व येणी | | | ३१-०३-२०१४ |
|---|---|---|---|---|
| २३,०७,१९,८४६.०७ | मागील पानावरुन... | | १९,०७,१५२.५० | २६,१२,१२,०७९.३९ |
| | क) कार्यालयीन सामग्री | | | |
| २,६७,२३५.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | २,६७,२३५.०० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ४४,५६७.०० | | |
| | | ३,११,८०२.०० | | |
| | वजा : घसारा | २९,९५३.०० | २,८१,८४९.०० | |
| | ड) विद्युत जोडणी | | | |
| १४,३७५.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | १४,३७५.०० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | १,६४,२२७.५० | | |
| | | १,७८,६०२.५० | | |
| | वजा : घसारा | २२,५८६.०० | १,५६,०१६.५० | २३,४५,०१८.०० |
| | ८) इतर मालमत्ता | | | |
| ३,००,०००.०० | जागेसाठी अनामत रक्कम | | २,५०,०००.०० | |
| ६,५००.०० | दूरध्वनी अनामत | | ६,५००.०० | |
| १,९९,७१०.०० | छपाई व स्टेशनरी | | १,५९,३९०.०० | |
| १९,३००.०० | चिकट मुद्रांक | | ३,३६०.०० | |
| ४३,१७,२२४.४९ | समाशोधन | | -- -- | |
| ३,०२,८१०.०० | येणे खाते | | ५२,६१३.०० | |
| ३६,०००.०० | आगाऊ खर्च तरतूद | | ९५,२६१.०० | |
| ३०,१७६.०० | आगाऊ विशेष सर्वसाधारण सभा खर्च | | -- -- | ५,६७,१२४.०० |
| | ९) आयकर | | | |
| १६,५०,०००.०० | अ) सन २०१३-२०१४ आगाऊ कर | | १७,५०,०००.०० | |
| १,९६,८५६.०० | ब) आयकर परतावा येणे (२००८-०९) | | १,९६,८५६.०० | १९,४६,८५६.०० |
| २३,८०,६०,०३२.५६ | एकूण | | | २६,६०,७१,०७७.३९ |

**श्री. वसंत बा. पांचाळ**
उपाध्यक्ष

**श्री. हरिष बा. परब**
अध्यक्ष

**श्री. अ. व. प्रभुदेसाई**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## NOTES ON ACCOUNTS AS ON 31-03-2014

(₹ in lakh)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| i) | Capital to Risk Assets Ratio (CRAR) | | | 29.15 |
| ii) | Movement of CRAR As on | 31-03-2013 | 29.78 | |
| | As on | 31-03-2014 | 29.15 | |

iii) Investment
a) Book value and Face value of investment
b) Market value of Investment

| | Book Value | Face Value | Market Value |
|---|---|---|---|
| Investment in Government Securities (A) | 784.04 | 800.00 | 750.92 |
| Investment in F.D.R. | | | |
| M.D.C.C. Bank | 170.51 | 170.51 | 170.51 |
| M.S.C. Bank | 0.00 | 0.00 | 0.00 |
| I.D.B.I. Bank | 47.00 | 47.00 | 47.00 |
| Total Investment in F.D.R. (B) | **217.51** | **217.51** | **217.51** |
| Total Investment (A+B) | **1001.55** | **1017.51** | **968.43** |

c) Details of Issuer composition of non-SLR investments and non performing non-SLR investments.

❑ **Issuer Composition of Non-SLR Investments**

| No. | Issuer | Amount | Extent of 'below investment grade Securities' | Extent of 'unrated Securities' | Extent of 'unrated Securities' |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | PSUs | NIL | NIL | NIL | NIL |
| 2 | FIs | NIL | NIL | NIL | NIL |
| 3 | Public Sector Banks | NIL | NIL | NIL | NIL |
| 4 | Mutual Funds | NIL | NIL | NIL | NIL |
| 5 | Other | | | | |
| | Shares of Co-op. Bank | 0.02 | NIL | NIL | 0.02 |
| | FDR with Mahanagar Co-op. Bank | 1.23 | NIL | NIL | 1.23 |
| 6 | Provision Held towards Depreciation | NIL | NIL | NIL | NIL |

- **Non performing Non-SLR Investments**

| Particulars | Amount (₹ in lakh) |
|---|---|
| Opening Balance | NIL |
| Additions during the year since 1st April | NIL |
| Reduction during the above period | NIL |
| Closing Balance | NIL |
| Total Provisions held | NIL |

iv) Advance against real estate, construction business, housing

| | |
|---|---|
| Real Estate | NIL |
| Construction Business | NIL |
| Housing | 153.46 |

v) Advance against shares and debentures NIL

vi) Advance to directors, their relatives, companies / firm in which they are interested :

a) Fund based NIL

b) Non-fund based (Guarantees, L/C, etc.) NIL

vii) Cost of Deposit : Average cost of Deposits 7.39%

viii) NPAs : ( ₹ in lakh)

a) Gross NPAs ₹ 66.67

b) Net NPAs ₹ 21.17

ix) Movement of NPAs i.e. Gross and net NPAs as on Balance Sheet date for the current year vis-a-vis previous year. Net NPAs Should be arrived at after deducting provisions held, interest suspense account etc.

**Movement of NPAs** ( ₹ in lakh)

| | As on 31-03-2013 | As on 31-03-2014 |
|---|---|---|
| Opening Balance | 65.56 | 81.37 |
| Addition during the year | 24.79 | 10.93 |
| | 90.35 | 92.30 |
| Less Recovery during the year | 8.98 | 25.63 |
| Gross NPA | 81.37 | 66.67 |
| Less Provision for BDDR | 44.00 | 45.50 |
| Net NPA | 37.37 | 21.17 |

x) Profitability :

| | |
|---|---|
| a) Interest income as a percentage of working fund | 9.63% |
| b) Non-interest income as a percentage of working fund | 0.39% |
| c) Operating profit as a percentage of working fund | 2.10% |
| d) Return on Assets | 1.39% |
| e) Business (Deposit + Advances) per employee | ₹ 229.40 lakh |
| f) Profit per employee | ₹ 2.51 lakh |

xi) Provision made towards NPAs, depreciation in Investment, Standerd Assets

( ₹ in lakh)

| | |
|---|---|
| Provision for NPA | 1.50 |
| Depreciation in Investment | 0.75 |
| Standerd Assets | 0.28 |

xii) Movement of provisions : [i.e. Provisions as on Balance Sheet date for the current year (e.g. March 31, 2014 vis-a-vis previous year e.g. March 31, 2013)]

( ₹ in lakh)

| | | 31-03-2013 | 31-03-2014 |
|---|---|---|---|
| a | Towards NPAs | ₹ 44.00 | ₹ 45.50 |
| b | Towards depreciation on investment | ₹ 2.65 | ₹ 3.40 |
| c | Towards Stadard asstes | ₹ 2.52 | ₹ 2.80 |

xiii) Foreign currencey assets & Liabilities : (if applicable) N. A.

xiv) Payment of DICGC Insurance Premium : ₹ 2.29 lakh up to date

UCBs are required to disclose whether insurance premium has been paid up to date To DICGC, indicating arrears, if any. (UBD. No. BP. 38/16.45.00/2004-05 dated March 06, 2003)

xv) Penalty imposed by RBI : (UBD. PCB. Cir. No. 40/16.45.00/2004-05 dated March 01, 2005) - N. A.

UCBs are also required to disclose the penalty imposed by RBI in the 'Notes on Accounts'to their Balace Sheet.

xvi) Restructured Accounts

UCB are required to disclose in their published annual Balance Sheets, under "Notes on Accounts", information relating to number and amount of advances restructured, and the amount of diminution in the fair value of their restructured advances as per the format given below. - NIL

xvii) Fixed Assets - Valuation / Revaluation - NIL

# सिंधुदुर्ग सहकारी बँक लि., मुंबई.

# उपस्थिती दाखला

## १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

### शनिवार, दिनांक २ ऑगस्ट २०१४

सभासद क्र. ____________________

असे नमुद करतो / करते की, मी सिंधुदुर्ग सहकारी बँक लि., मुंबई या बँकेचा / बँकेची सभासद असून १६ व्या वार्षिक सभेस शनिवार दि. २ ऑगस्ट २०१४ रोजी सायं. ५.०० वाजता डॉ. शिरोडकर स्मारक मंदिर सभागृह, नरेपार्क, परेल, मुंबई येथे उपस्थित आहे.

____________________________ ______________________

**सभासदाचे पूर्ण नांव** **सभासदाची सही**

टिप : – कृपया सभासदांनी उपस्थिती दाखला संपूर्ण तपशीलासह भरुन बँकेच्या प्रतिनिधींकडे द्यावा.

उपस्थिती दाखला न दिल्यास गैरहजर समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

# नोंदी